महाराष्ट्र शासन

# राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, महाराष्ट्र, मुंबई

जुने सचिवालय विस्तार इमारत, तळ मजला, जहांगीर आर्ट गॅलरीसमोर, एलफिस्टन कॉलेजच्या पाठीमागे, महात्मा गांधी मार्ग, मुंबई- ४०० ०३२
०२२-२२०५७४०९/२२०७२०९७/२२८२१८१० E-mail : mah-sforum@nic.inWebsite:- www.grahak.maharashtra.gov.in

जा.क्र.राआ/महा./PRO/ २०२४/ १४८७ दिनांकः- १२.०४. २०२४

## नोटीस

राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग,महाराष्ट्र, मुंबई या कार्यालयातील न्यायाधीशांना ग्राहक संरक्षण बाबतचे मा. सर्वोच्च न्यायालय, मा. राष्ट्रीय ग्राहक आयोग, देशातील इतर राज्य ग्राहक आयोग व जिल्हा आयोग यांनी दिलेले न्यायनिर्णय संदर्भाकरीता वापरण्यासाठी न्यायनिर्णय ऑनलाईन सॉफ्टवेअर उपलब्ध करून देण्याचे प्रस्तावित आहे.

याकरीता मा. सर्वोच्च न्यायालय, मा. राष्ट्रीय ग्राहक आयोग, देशातील इतर राज्य ग्राहक आयोग व जिल्हा आयोग यांनी ग्राहक संरक्षणाबाबत दिलेले न्यायनिर्णय ऑनलाईन तसेच पुस्तकांच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्याकरीता पुरवठादारांकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

तरी उपरोक्त सॉफ्टवेअर व पुस्तके Consumer Protection Judgments Online Software पुरवठा करणा-या पुरवठादारांनी दि. **१९.०४.२०२४** रोजी पर्यत सर्व करांसहित दरपत्रक या कार्यालयास सादर करावे.

ऑनलाईन सॉफ्टवेअर चे दरपत्रक वेगळे सादर करावे व पुस्तके पुरविण्याचे दरपत्रक वेगळे सादर करावे. दरपत्रकामध्ये सदस्यता **(Subscription)** किती कालावधीकरीता आहे याचा स्पष्ट उल्लेख करावा. सदस्यता **(Subscription)** नुतनीकरण **( Renewal)** करण्यासाठी देखील दर नमुद करावा.

सदरची नोटीस मा. अध्यक्ष, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, यांच्या पूर्व मान्यतेने प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**( विनय म. खोपटकर )**
**प्र. प्रबंधक विधी /प्रशासन,**
**राज्य ग्राहक तक्रार निवारण**
**आयोग, महाराष्ट्र, मुंबई**